IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 ISSN 2319-4766
AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE,2021, VOL- 10, ISSUE-57

Special Issue of Department of Sociology,
Lokmanya Mahavidyalaya Warora, Dist. Chandrapur (MS)

Date: 26 June 2021

# TRIBAL SOCIETY

## IN CONTEMPORARY INDIA : ISSUES , PROBLEMS & REMEDIES

**Chief Editor**
Dr. Subodh Kumar Singh
Principal

**Editor**
Dr. Shrinivas Pilgulwar
Head, Dept of Sociology



Book-3

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR
PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE, 2021, VOL- 10, ISSUE-57

## Special Issue of Department of Sociology, Lokmanya Mahavidyalaya Warora, Dist. Chandrapur

On

# TRIBAL SOCIETY IN CONTEMPORARY INDIA: ISSUES, PROBLEMS & REMEDIES

**Chief Editor**

Dr. Subodh Kumar Singh
Principal

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

**Editor**

Dr. Shrinivas Pilgulwar
Head, Department of Sociology

IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380

ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE, 2021, VOL- 10, ISSUE-57

## Index


| SR. NO. | AUTHOR NAME | PAGE.NO. |
|---|---|---|
| 101 | नांदेड जिल्हयातील भिल्ल जमातीच्या शैक्षणिक प्रगतीचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>*डॉ. श्रीनिवास नरहरी पिल्गुलवार* | 605-614 |
| 102 | वनविषयक कायदे व आदिवासी<br>*डॉ. डी. जी. म्हशाखेत्री* | 615-620 |
| 103 | समकालीन भारतातील आदिवासी चळवळी<br>*डॉ. नागसेन नामदेव मेश्राम* | 621-629 |
| 104 | आदिवासी समाजातील लिंगभाव असमानता आणि आरोग्य प्रश्न<br>*डॉ कविता दि. मुनेश्वर* | 630-633 |
| 105 | आदिवासी समाजातील सामाजिक आंदोलने व परिवर्तन<br>*प्रा. डॉ. कमलाकर पी. तागडे* | 634-642 |
| 106 | आदिवासी समाजातील बालकामगारांच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुका)<br>*प्रा. डॉ. गजेंद्र माणिकराव कढव* | 643-650 |
| 107 | आदिवासींच्या विकासासाठी शासनाचे प्रयत्न<br>*प्रा. डॉ. दिपक एम. सुखदेवे* | 651-656 |
| 108 | आदिवासींची सामाजिक संरचना : प्रश्न आणि उपाय<br>*डॉ चंद्रकांत ध. कांबळे* | 657-666 |
| 109 | आदिवासी समाजातील स्त्रियांच्या आरोग्याची समस्या<br>*डॉ विलास चव्हाण* | 667-670 |
| 110 | आदिवासी स्त्री समस्या<br>*प्रा. रीता द. वाळके* | 671-673 |
| 111 | आदिवासींचे कुपोषण — एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>*प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार* | 674-680 |


DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

112 भारतातील आदिवासी समाजाच्या समस्या 681-685
*डॉ. रामेश्वर एस. मोरे*

113 भारतातील आदिवासींच्या प्रमुख समस्या 686-689
*डॉ. आर. व्ही. मोरे*

114 खासी व गोरा या आदिवासी जमातीतील मातृसत्ताक पद्धती व स्त्रियांचा दर्जा 690-692
*डॉ. रत्नाकर रामा पिंपळपत्ते*

115 बिरसा मुंडा एक बहुआयामी आदिवासी नेतृत्व, एक बहुआयामी आदिवासी चळवळ 693-700
*प्रा. डॉ. प्रफुल्ल सुभाषराव देशमुख*

116 गडचिरोली जिल्हयातल्या भामरागड तालुक्यातील माडिया गोंडांचे समाजजीवन : एक भौगोलिक दृष्टिक्षेप 701-707
*प्रा. डॉ. दिलीप मनोहरराव मुगळे*

117 विदर्भातील आदिवासी समाजातील सार्वजनिक आरोग्यविषयक प्रश्न (परिणाम व उपाय) 708-717
*डॉ. दिलीप पांडुरंग महाजन*

118 आदिवासींच्या शैक्षणिक समस्या, घटनात्मक तरतूदी आणि कायदे 718-726
*प्रा. डॉ. डी. टी. शेंडे*

119 आधुनिकीकरणामुळे गोंड जमातीतील स्त्रीयांमध्ये झालेले परिवर्तन (विशेष संदर्भ — झरीजामणी तालुका) 727-730
*डॉ. छाया नेम्माणीवार*

120 मुलचेरा तालुक्यातील आदिवासी समाजाचे आर्थिक अध्ययन 731-737
*प्रा. डॉ. भारत हिम्मतराव पांडे*

121 कोरोना महामारी आणि आदिवासी शिक्षण 738-741
*Shelake Dnyaneshwar Waman*

122 आदिवासी आणि नागरी समाज: जीवनपध्दती आणि मुल्ये यांचे तुलनात्मक अध्ययन 742-751
*डॉ. प्रविण दिगांबर मुधोळकर*

123 आदिवासी विकासयोजनांचा आदिवासींवर विकासात्मक प्रभाव 752-756
*डॉ. विनोद बी. खेडकर*

124 भारतातील आदिवासींच्या सामाजिक चळवळींचा विश्लेषणात्मक अभ्यास 757-766
*डॉ. ज्योती अरविंद पोटे*

125 आदिवासी क्षेत्रातील बालकांच्या कुपोषणाची कारणे व उपाययोजना 767-771
*डॉ. माया बी. मसराम*


DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

SJIF2021=7.380

Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies

ISSN: 2319-4766

# आदिवासी विकासयोजनांचा आदिवासींवर विकासात्मक प्रभाव

डॉ. विनोद बी. खेडकर

सहाय्यक प्राध्यापक, डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर, मो. न. ९४२२५३७१२३

E-mail: khedkarvinod09@gmail.com

## गोषवारा

*भारतीय समाजव्यवस्थेत आदिवासी समुदायास विशेष महत्त्व आहे, कारण आदिवासींची जीवनपद्धती, राहणीमान, रितिरिवाज, भाषा, खान–पान, संस्कृती व प्रथा–परंपरा ह्या इतर समाजापेक्षा भिन्न आहेत. दऱ्या–खोऱ्यात, डोंगर व जंगलांमध्ये वास्तव्य करणारा हा समाज भिन्न संस्कृतीचा म्हणून ओळखला जातो. एकाच भूभागावर निवास करणाऱ्या, सर्वसामान्यपणे एकच नाव किंवा उपनाव आडनावे लावणाऱ्या, एकाच प्रकारची भाषा बोलणाऱ्या, विवाह संबंध आणि व्यवसायाच्या बाबतीत एकाच प्रकारचे मत ते निषेधात्मक असो वा संमतीदर्शक असे नियम पाळणाऱ्या, निश्चीतपणे एका विशिष्ट प्रकारची मूल्य व विचार प्रणाली यांची जपवणूक करणाऱ्या कुटुंबाच्या समुदायाला आदिवासी समुदाय किंवा आदिवासी समाज असे म्हणतात. आदिवासी समाज आज दुर्गम अशा डोंगराळ प्रदेशात राहात असल्याने त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. आरोग्य, शिक्षण, विकासात्मक समस्या आदिवासींना मोठ्या प्रमाणात भेडसावत आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार फक्त महाराष्ट्रातील आदिवासींची लोकसंख्या८.८७ टक्के एवढी आहे. महाराष्ट्रात १४ जिल्ह्यात आदिवासींचे वास्तव्य आहे. केंद्र व राज्य शासनाच्या अनेक विकासाच्या योजना या आदिवासींपर्यंत पोहोचल्या आहेत, परंतु योग्य पद्धतीने अंमलबजावणीच्या अभावामुळे आदिवासींच्या विकासावर म्हणावा असा प्रभाव दिसत नाही. असे असले तरी आदिवासींच्या विकास योजनांचा आदिवासींच्या विकासामध्ये मोलाचे योगदान दिले.*

*प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्र शासनाच्या आदिवासींसाठीच्या विविध विकास योजनांचा आदिवासींवरील विकासात्मक प्रभावांचा शोध घेण्यात आला आहे. याकरिता संशोधन पद्धतीतील तथ्य संकलनाची व्दितीयक पद्धतीचा उपयोग करून वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब केला आहे.*

***बीजशब्द:*** *आदिवासी समुदाय, आदिवासी विकास, विकास योजना.*

## प्रस्तावना

भारताच्या जवळजवळ प्रत्येक राज्यांमध्ये आदिवासी समुदाय वास्तव्य करतो. २०११ च्या जनगणनेनुसार भारतामध्ये ८.६टक्के आदिवासी वास्तव्य करतात पैकी ५.१ टक्का महाराष्ट्रामध्ये वास्तव्यास आहे. महाराष्ट्र मध्ये एकूण १४ जिल्ह्यांमध्ये ४७प्रमुख जमाती वास्तव्य करतात. तसेच आदिवासींना त्यांचे स्वत:चं असं एक अस्तित्व आहे आणि हे महाराष्ट्रातील जनतेने मान्य केलेले दिसून येते. आदिवासींच्या प्रथा–परंपरा, जीवनमान, सामूहिक निर्णय, सण–उत्सव, भाषा, राहणीमान, पोशाख अशा अनेक बाबतीत आदिवासी इतरांपेक्षा वेगळा ठरतो. अशा या आदिवासी समुदायांमध्ये अनेक प्रश्न, समस्या आपणास दिसतात. दारिद्रय, कुपोषण, अज्ञान, अनारोग्य, बेरोजगारी, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा, पिळवणूक, स्त्रियांवरचे अत्याचार असे अनेक प्रश्न त्यांचे जीवन कठीण करत आहे.

महाराष्ट्रामध्ये आदिवासींच्या विविध समस्या, प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न झाले. यामध्ये आरोग्य, शैक्षणिक, जंगल तोड, बेरोजगारी, दारिद्रय व शोषणाच्या समस्या प्रामुख्याने आहेत. विविध संस्था, संघटना आदिवासींच्या विकासासाठी प्रयत्न करीत आहेत. यांच्या या प्रयत्नांमुळे कुळ कायदा, कमाल जमीन धारणा कायदा, सावकारी नियंत्रण कायदा, जमीनदारी, आर्थिक शोषण, जमीन हस्तांतरण नष्ट करणारे कायदे करण्यात आले. यामुळे आदिवासींना काहीसा दिलासा जरी मिळाला असला तरी त्यामधील पळवाटा, अंमलबजावणीसाठीचा विलंब व अडथळे, शासकीय अधिकारी आणि राजकीय पुढारी यांच्या भ्रष्टाचारामुळे आदिवासी विकासापासून कोसो दूर आहे.



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

गेल्या काही वर्षाचा तपशील पाहिला तर आदिवासी कुटुंबाच्या आर्थिक विकासामध्ये घसरण झालेली दिसते. महाराष्ट्र शासनाच्या अनेक योजनांपासून आदिवासी वंचित आहे. यामुळे त्यांच्या विकासाला योग्य दिशा प्राप्त होत नाही. असे असले तरी आदिवासींच्या विकासासाठी महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाने विविध योजनांद्वारे आदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवून दिला आहे. त्यामुळे त्यांच्या सामाजिक व आर्थिक जीवनमानात कमालीची सुधारणा घडून आलेली आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये आदिवासींसाठींच्या ज्या विविध योजना आहेत, त्यामध्ये शैक्षणिक योजना, आरोग्य विषयक योजना, आर्थिक उन्नतीच्या योजना आणि इतर योजनांचा आदिवासींवरील प्रभावाचा व त्यांच्यामध्ये घडून आलेल्या बदलांचा अभ्यास केला आहे.

**पद्धतीशास्त्र**

प्रस्तुत संशोधनासाठी सामाजिक संशोधनातील विविध पद्धतींचा अवलंब करून आदिवासींच्या विकासात्मक प्रभावांचा शोध घेण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. आदिवासींसाठींच्या शैक्षणिक योजनांचा आदिवासींवरील विकासात्मक प्रभावांचा शोध घेणे.

२. आदिवासींसाठींच्या आर्थिक उन्नतीसाठीच्या योजनांचा आढावा घेऊन त्यांच्या विकासाची प्रक्रिया जाणून घेणे.

**संशोधनाचे क्षेत्र**

प्रस्तुत अध्ययनासाठी महाराष्ट्र राज्य हे क्षेत्र निवडले असून महाराष्ट्रातील आदिवासी समुदायासाठींच्या योजनांचा विविध आकडेवारीच्या आधारे अध्ययन केले आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत अध्ययानाकरिता व्दितीयक स्रोतांचा उपयोग केला आहे. यामध्ये शोध प्रबंध, वृत्तपत्रे, इंटरनेट, विविध अहवाल आणि शोध पत्रिकांचा उपयोग केला आहे.

**आदिवासींसाठीच्या शैक्षणिक योजना**

आदिवासींच्या मुला–मुलींच्या शिक्षणाची समस्या दूर करून त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता महाराष्ट्र राज्य अंतर्गत विविध शैक्षणिक योजना राबविण्यात आल्या. त्याचा फायदा म्हणून आदिवासींची अनेक मुले–मुली विविध शासकीय, निमशासकीय आणि खासगी संस्थांमध्ये प्रशासकीय पदावर कार्यरत आहेत. अशा विविध योजनांचा आढावा घेण्यात आला आहे.

- **शासकीय आश्रमशाळा समुह योजना**

महाराष्ट्र राज्यात डोंगराळ व दुर्गम भागांमध्ये वास्तव्य करणाऱ्या आदिवासींची सामाजिक व शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी आश्रम शाळांची निर्मिती करण्यात आली. या शाळांच्या माध्यमातून आदिवासींचा मूलभूत विकास व्हावा व त्याचा फायदा सर्वांना व्हावा हा उद्देश ठेवण्यात आला होता. या आदिवासी शाळेमध्ये मोफत शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना निवास, भोजन व्यवस्था, गणवेश, अंथरून–पांघरून आणि पुस्तके यांची व्यवस्था करण्यात आली. महाराष्ट्रामध्ये ५०२ शासकीय आश्रम शाळा व ४९१ वसतीगृहे कार्यरत आहेत. यामध्ये २०१८ पर्यंत २ लाख विद्यार्थी शिक्षण घेत होते.

M. K. ... COLLEGE NAGPUR

या आश्रमशाळांच्या माध्यमातून आदिवासींच्या शिक्षणाचा दर्जा सुधारलेला आहे. यातून त्यांच्या बोलीभाषा, संस्कृती, परंपरा, विचारधारा, जोपासण्याचे काम या माध्यमातून केले जाते. तसेच त्यांना सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास साधण्याचा प्रयत्न यातून होताना दिसतो.

- **अनुदानित आश्रमशाळा:**

डोंगराळ आणि दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींसाठीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधेसाठी स्वेच्छा संस्था मार्फत अनुदानित तत्वावर आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या. राज्यात एकूण ५५६ अनुदानित आश्रमशाळा असून यामध्ये पहिली ते बारावी पर्यंतचे विद्यार्थी शिक्षण घेतात. या आश्रम शाळेमध्ये विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, शैक्षणिक साहित्य मोफत पुरविले जाते. ही योजना एकात्मिक आदिवासी प्रकल्प योजनेअंतर्गत चालवली जात असून दुर्गम भागात वास्तव्य करणारे आदिवासींच्या विकासाकरीता प्रभावी माध्यम ठरत आहे. सुरुवातीला या योजनेस योग्य प्रतिसाद मिळाला नाही, परंतु आश्रम शाळेच्या शिक्षकांनी प्रत्यक्ष विद्यार्थी व पालकांपर्यंत जाऊन त्यांना समुपदेशन करून यामध्ये सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. याचाच परिणाम म्हणून आदिवासी विद्यार्थी आज देशाच्या व राज्याच्या विकासामध्ये महत्वाचा वाटा उचलताना दिसतात.

- **एकलव्य इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळा:**

आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी मधून शिक्षण मिळावे याकरिता केंद्र पुरस्कृत योजना म्हणून इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा सुरू करण्यात आल्या. यामध्ये निवास व्यवस्था, भोजन, गणवेश, पुस्तके व लेखन साहित्य विद्यार्थ्यांना मोफत पुरविले जाते. यामुळे अनेक विद्यार्थ्यांना फायदा होऊन विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी प्रेरित होत आहेत. यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजीमधून शिक्षण तर मिळतच आहे, परंतु त्यांना देश–विदेशामध्ये महत्त्वाच्या संधी देखील प्राप्त होताना दिसतात. आज देशामध्ये इंग्रजीचे महत्त्व पाहता आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षण हे महत्त्वाचे आणि प्रभावी साधन ठरणार आहे.

या योजनांव्यतिरिक्त आदिवासी विद्यार्थ्यांकरीता त्यांच्या विकासाकरीता तसेच आदिवासी मुख्य प्रवाहात यावा या उद्देशाने शैक्षणिक योजना राबवल्या गेल्या. त्यामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या आदिवासींसाठी विविध शिष्यवृत्ती, परदेशामध्ये उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनां महाराष्ट्र शासनातर्फे शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्ती नमुन आदिवासी विद्यार्थी टेक्निकल शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, वाणिज्य शिक्षण, पीएच.डी घेऊन आज मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत. यामुळे आदिवासी विद्यार्थी प्रेरित होऊन शैक्षणिक प्रवाह मध्ये येण्यासाठी धडपडत असताना दिसून येतो. तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा आकस्मिक मृत्यू झाल्यास पालकांसाठी सानुग्रह अनुदान देण्याची योजना, अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना, व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता इत्यादी योजना राबविल्या जातात. या योजनांचा मुख्य उद्देश हाच की आदिवासींना मुख्य प्रवाहात आणने. जेणेकरून त्याचा सर्वांगीण विकास साध्य होईल आणि हा विकास या शैक्षणिक योजनांद्वारे साध्य होताना दिसतो.

**आदिवासींसाठी आर्थिक उन्नतीच्यायोजना**

व्यक्ती, कुटुंब आणि समाजाच्या सर्वांगीण विकासामध्ये आर्थिक घटक महत्त्वपूर्ण ठरतो. व्यक्तीच्या आर्थिक उन्नतीचा प्रभाव सामाजिक विकासावर पडतो. याच दृष्टिकोनातून आदिवासीचा आर्थिक विकास साधण्यासाठी अनेक योजना महाराष्ट्र राज्यद्वारे राबविल्या आहेत.



R. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप पुरवठा करणे. ही योजना आदिवासी शेतकऱ्यांना नवसंजीवनी ठरत आहे. या योजनेचा मुख्य उद्देश आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीचा किफायतशीर विकास होण्याच्या दृष्टीने त्यांच्याकडे असणाऱ्या साधनांचा व उर्जेचा पुरेपूर उपयोग करून जास्तीत जास्त शेतजमीन ओलिताखाली आणणे होय. यासाठी १०० टक्के अनुदानावर त्यांना वीजपंप/तेलपंप उपलब्ध करून दिला जातो. आदिवासींच्या आर्थिक विकासासाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना होय. ज्या योजनेचा समावेश अर्थसंकल्पामध्ये होत नाही अशा अभिनव स्वरूपाच्या स्थानिक महत्त्वपूर्ण कर्ज विरहित योजना आदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याच्या हेतूने राबवल्या जात आहेत. तसेच भूमीहीन आदिवासी शेतमजूर कुटुंबासाठी स्वाभिमान व सबलीकरण योजना राबवली जात आहे. यामध्ये दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना शासनाच्या दराप्रमाणे शेत जमीन खरेदी करून दिली जाते. आतापर्यंत आदिवासींच्या बहुतांश कुटुंबांनी या योजनेचा लाभ घेतलेला दिसतो.

आदिवासी युवकांकरिता स्थानिक गरजांवर आधारित लहान–लहान प्रशिक्षण अभ्यासक्रम राबवून त्यांना स्वयंरोजगाराची संधी देणे, कुशल कारागीर उपलब्ध करून देणे, तसेच स्वयंरोजगारासाठी कर्ज पुरवठा ही एक महत्त्वाची योजना आदिवासींसाठी राबविली जाते. यामध्ये आदिवासी बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने स्वतःचे विविध व्यवसाय सुरू करण्याकरता अर्थसाह्य उपलब्ध करून दिले जाते. या प्रशिक्षणाद्वारे प्रशिक्षणार्थींना त्यांच्या कामकाजासंबंधी आवश्यक ज्ञान, माहिती, विविध कायदे, शासकीय नियम–नियमावली, कौशल्य वृद्धी आणि त्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या यांची जाणीव करून देणे व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करिता त्यांना अधिक कार्यक्षम बनविणे ही उद्दिष्टे आहे.

आदिवासी लोकांसाठी असलेल्या पाणी पुरवठा, आरोग्य सुविधा इत्यादी सारख्या निरनिराळ्या योजनांची एकात्मिकपणे व समन्वयाने अंमलबजावणी करणे आणि त्यांना बळकटीदेण्यासाठी नवसंजीवनी योजना राबवली जाते. या योजनेअंतर्गत खावटी योजना, धान्यकोष योजना, आरोग्य सेवा, पोषण कार्यक्रम प्रभावीपणे राबविल्या जातात. आदिवासींना ऐन पावसाळ्यापूर्वी रोजगार उपलब्ध होत नाही, त्या कालावधीत आदिवासींची उपासमार होऊ नये, म्हणून खावटी कर्ज योजना शासनाने १९७८ पासून सुरू केली. आदिवासी विकास महामंडळामार्फत ही योजना राबविण्यात येत आहे. ही योजना ३० टक्के अनुदान आणि ७० टक्के कर्ज स्वरूपात आहे. या कर्जात ३० टक्के रक्कम रोख स्वरूपात तर ७० टक्के रकमेच्या वस्तू दिल्या जातात. छोटया कुटुंबांना २ हजार रुपये तर मोठया कुटुंबांना ४ हजार रुपयांपर्यंत कर्ज मिळते. २०१३ मध्ये बंद पडलेली ही योजना २०२१ मध्ये पुन्हा सुरू करण्यात आली. २००९ ते २०१४ या कालावधीमध्ये महाराष्ट्र आदिवासी शेतकरी आणि शेतमजुरांसाठी २४४ कोटी ९९ लाख रुपये कर्ज वाटप करण्यात आले होते. तर २०२१ मध्ये या योजनेचे उद्दिष्टे ४८६ कोटी एवढे ठेवण्यात आले आहे. म्हणजेच आदिवासींच्या विकासासाठी शासन विविध स्तरावरून प्रयत्नशील असलेले आपल्याला दिसते. या व्यतिरिक्त मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना देखील राबवून आदिवासींसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविलेला आहे. या योजनेद्वारे आदिवासींचा आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न महाराष्ट्र सरकार करत आहे. या योजनेद्वारे आज पर्यंत अनेक आदिवासींनी लाभ घेऊन उत्पन्न मर्यादा जवळजवळ ४० टक्क्यांनी वाढवलेली आहे. याचा प्रत्यक्ष परिणाम आदिवासींच्या आर्थिक विकासावर झालेला दिसतो.

**सारांश**

भारताच्या जवळजवळ प्रत्येक राज्यात आदिवासी जमाती वास्तव्य करत आहेत. महाराष्ट्रात एकूण ४७प्रमुख जमाती वास्तव्य करत असून आज विकासाच्या प्रवाहामध्ये काहीं प्रमाण मनात आलेल्या दिसतात. महाराष्ट्र राज्य व केंद्राद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजनांमुळे आज आदिवासी विकास प्रक्रियेत आला आहे. आदिवासी विकासासाठी

राबविल्या गेलेल्या योजनांचा त्यांच्यावर प्रत्यक्ष प्रभाव दिसून येतो. शैक्षणिक योजना ज्यामध्ये शासकीय आश्रमशाळा सपूर्ण योजना, स्वयंसेवी संस्थांना आश्रमशाळा, एकलव्य आश्रमशाळा, शासकीय वसतिगृहे, शिष्यवृत्ती योजना तसेच आर्थिक उन्नतीच्या योजनांमध्ये खावटी योजना, धान्यकोष योजना इत्यादींद्वारे आदिवासींचा विकास साधण्याचा प्रयत्न झाला आहे. या व्यतिरिक्त आदिवासी हस्तकलांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, पारंपारिक नृत्य व संस्कृतीची जपणूक करण्यासाठी प्रोत्साहन देणे, त्यांना स्पर्धा पूर्व प्रशिक्षण देणे, नवसंजिवनी योजनेअंतर्गत रोजगार विषयक कार्यक्रम, आरोग्य कार्यक्रम, पोषण कार्यक्रम राबविले जातात. तसेच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्त्या दिल्या जातात. त्याचबरोबर MPSC व UPSC व तत्सम स्पर्धा परीक्षा करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम व मोफत कोचिंग दिले जाते. यामुळे आदिवासी समाजाच्या विकासाची प्रक्रिया जलद गतीने होत असून आज आदिवासी समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात आला आहे. असे असले तरीही काही प्रमाणात आदिवासी जो दुर्गम व डोंगराळ भागात व जंगलामध्ये राहणारा आदिवासींपर्यंत या योजना पोहोचलेल्या नाहीत यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

## संदर्भ ग्रंथ


१. *नाडगोंडे, गुरुनाथ .(२००३). भारतीय आदिवासी, पुणे: कॉन्टिनेन्टल प्रकाशन.*

२. *गोलकर, अमृता .(२००९). आश्रमशाळा संहिता, औरंगाबाद: श्री विद्या प्रकाशन.*

३. *कुलकर्णी, शौनक .(२००१). महाराष्ट्रातील आदिवासी, पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.*

४. *योजना, मासिक*

५. *लोकराज्य, .(ऑगस्ट २०१३). माहिती व जनसंपर्क महासंचनालय, महाराष्ट्र राज्य.*

६. *www-mr-vikaspedin-in/social-welfare*

७. *www-tribal-maharashtra-gov-in*


PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022
DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR